**आर.सी.सी.क्र.३०५/२०२३**

**सरकार वि. वसिम शेख**

**नि.क्र.४१**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांचा पुरावा**.

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करते की,

माझे नांव – अलिशा रसुल शेख,

वय – ४० वर्षे, व्यवसाय - शेती,

राहणार – हसनापुर, ता. शेवगाव, जि.अहमदनगर

सरतपासणी सहा**.** सरकारी वकील **श्रीमती पी.आर.गिते यांचेमार्फतः**–

१. फिर्यादी अंजुम माझी मुलगी असुन आरोपी क्र. १ वसिम हे तिचे पती आहेत. आरोपी क्र.२ ते ७ हे आरोपी क्र.१ चे नातेवाईक आहेत.

२. आरोपी क्र.१ व माझ्या मुलीचे लग्न चार वर्षांपुर्वी हसनापुर ता.शेवगाव येथे झाले होते. ती लग्नानंतर आरोपी क्र.१ यांच्याकडे नांदण्यासाठी महाकाळा, ता.अंबड, जि.जालना येथे गेली. माझे मुलीचे व तिचे पती दरम्यान व्यवस्थीत संवाद होत नव्हते. माझे मुलगी व आरोपीदरम्यान किरकोळ कारणांवरुन वाद झाले होते. याव्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत चौकशी केली नव्हती.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजूर करण्यात आली).*

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या मुलीकडे घर बांधण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी करुन तिला मारहाण केली व माझा शारिरीक व मानसिक छळ केला. हे म्हणणे खरे नाही की, दि.०३.०६.२०२३ रोजी माहेर वरुन पाच लाख रुपये आणत नसल्याने आरोपींनी माझ्या मुलीस घरातुन हाकलुन दिले. आता साक्षीदारास तिच्या जबाबातील अधोरेखीत भाग 'अ' वाचुन दाखवला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी जबाबातील

अधोरेखीत भाग अ माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदवुन घेतला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्या मध्ये वाद मिटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचवण्यसाठी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.ए.बी.शेख यांचेमार्फतः-</u>

उलटतपासा नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृति

KULKARNI DATTATRAYA RAMESH

Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2026.03.10 12:59:31 +0530

दिनांक-१०.०३.२०२६

(डी.आर.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी,
(कोर्ट नं.३) शेवगाव.